सोलापूर महानगरपालिकेच्या ~~तहकूब~~/मामुली/~~विशेष~~
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.३२२ ठ. क्र. २८३
दि. १९/१/१६ रोजी ठेवता खालील प्रो. ठराव
~~बहुमताने~~/सर्वानुमते पास झाला.



सोलापूर महानगरपालिका येथील मार्कंडेय जलतरण तलावाच्या बाजूकडील जागेत एमपीएससी/ युपीएससी स्टडी सेंटर व वाचनालय बांधणेबाबत प्रस्तावात नमूद कारणास्तव यापूर्वी मनपा ठराव क्र. ८० दि. २६-८-१४ ने सन २०१४-१५ भांडवली कामाच्या खर्चाच्या तक्त्यामधील अ.क्र. १९ सोमपा सुवर्ण महोत्सव वर्ष साजरा करणे या तरतूदीतून मंजूरी दिली असलेने तसेच प्रस्तावात नमूद केलेप्रमाणे विषयांकित कामाचे फेरपूर्वगणनपत्रक क्र. ३३/२०१५-१६ र.रु. ५७,९५,०००/- इतक्या रक्कमेचे तयार केले असून त्यास मा. सर्वसाधारण सभेची मान्यता मिळणेकामी मा. आयुक्त यांचे दि. ३०-१२-१५ चे टिपणी प्रमाणे मान्यता देणेत येत आहे.

प्र नगरसचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या ~~तहकूब~~/मामुली/~~विशेष~~
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.ज. ३१६ ठ. क्र. २६४
दि. १९/१/१६ रोजी ठेवता खालील प्रो. ठराव
बहुमताने/सर्वानुमते पास झाला.



होम मैदान जिल्हाधिकारी कार्यालयाच्या कंपौंड भिंतीच्या समांतर असलेल्या दक्षिणोत्तर रस्ता करणेबाबत प्रस्तावात नमूद कारणास्तव प्रकरणी कामाची तातडी पाहता विषयांकित नमूद कामाकरिता सविस्तर पूर्वगणनपत्रक क्र. ३२/२०१५-१६ र.रु. ५८,००,४६५/- इतक्या रक्कमेचे तयार करणेत येऊन, विषयातील कामी पूर्वगणनपत्रकास सक्षम मान्यता घेणे व जाहिर प्रसिध्दीकरण करणे, त्यानुसार मक्तानिश्चित करणे इ. कामी लागणरा कालावधीचा विचार करता सदर कामाची तातडी व निकड व मा. जिल्हाधिकारी यांचे आदेश पाहता दि. १५ नोव्हेंबर २०१५ पूर्वी रस्त्याचे काम करणेचे दृष्टीने सदरचे काम अशा प्रकारचे माहितीगार व अनुभवी स्थानिक नोंदणीकृत मक्तेदार श्री. अजिंक्य बिल्डर्स सोलापूर यांचेकडून एस्टीमेट दरापेक्षा ३% कमीचे दराने मुं.प्रां.महा.अधिनियम १९४९ चे कलम ६७ (३) (क) अन्वये करुन घेणेस, खर्चास व त्यांना जा.क्र. नअ/५८, दि. ३१-१०-२०१५ अन्वये वर्कऑर्डर दिलेली असून, सदरच्या कामाबाबतची माहिती मा. स्थायी समिती मार्फत मा. सर्वसाधारण सभेकडे सादर करणेकामी मा. आयुक्त यांचे दि. २८-१०-१५ चे टिपणीने आलेले प्रकरणास मा. सर्वसाधारण सभेकडे माहितीस्तव शिफारस करणेकामी मा. स्थायी समिती ठराव क्र. ५०२, दि. ३१-१२-१५ चे शिफारशीने आलेल्या प्रकरणाचे अवलोकन केले.

याकामी डी.पी.डी.सी.फंडातून निधी तरतूद करणे अथवा महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ९० (१) (२) (३) नुसार मा. आयुक्तांनी कार्यवाही ठेवावी व संबंधितास बिले अदा करणेस मान्यता देणेत येत आहे.

प्र. नगरसचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या ~~तहकूब~~/मामुली/~~विशेष~~
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.ज. 320 ठ. क्र. 285
दि. 9/2/16 रोजी ठेवता खालील प्रो. ठराव
बहुमताने/~~सर्वानुमते~~ पास झाला.



रघोजी ट्रान्सपोर्ट लगत ते शेळगी नाला येथे ९०० मिमि व्यासाची ड्रेनेज लाईन टाकणेबाबत प्रस्तावात नमूद कारणास्तव विषयांकित कामाचे पूर्वगणनपत्रक क्र. ०१/२०१५-१६ र.रु. ४७,३९,३८०/- इतक्या रकमेचे बजेट तरतूद उपलब्ध होऊन मिळणेकामी मा. आयुक्त यांचे दि. १७-१२-१५ चे टिपणीनुसार मान्यता देणेत येत आहे.

याकामी मनपा अंदाजपत्रक सन २०१५-१६ चे भांडवली कामाच्या खर्चाचा तक्त्यामधील अ.क्र.०७ मधील ड्रेनेज लाईन घालणे व गटारी बांधणे र.रु. ५.०० कोटी या तरतूदीतून बजेट तरतूद करणेस व पूर्वगणनपत्रकास मान्यता देणेत येत आहे.

(signature)
प्र नगर सचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या ~~तहकूब~~/मामुली/~~विशेष~~
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.ज. ३२७ ठ. क्र. २६६
दि. १९।९।९६ ....रोजी ठेवता खालील प्रो. ठराव
~~बहुमताने~~/सर्वानुमते पास झाला.



सोलापूर येथील सिध्देश्वर पेठ उर्दू शाळा नं. १ च्या जवळ होणा-या मिनी शॉपिंग सेंटरला **मरहूम बाबूमियाँ हत्तूरे** असे नामकरण करणेस सदर ठिकाणी नामफलक लावणेस मान्यता देणेस्तव आलेल्या प्रस्तावाचे अवलोकन केले.

मा. नामाभिदान समितीकडे पाठविणेस मान्यता देणेत येत आहे.

प्र नगरसचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या ~~तहकूब~~/मामुली/~~विशेष~~ सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.ज 330 ठ. क्र. 280 दि. 9/7/16 रोजी ठेवता खालील प्रो. ठराव ~~बहुमताने~~/सर्वानुमते पास झाला.



सोलापूर शहरातील पाणीपुरवठयाचे संकट पहाता नागरिकांना प्रत्येक प्रभागात बोअरवरील पाणी उपलब्ध करुन दिल्यास काही प्रमाणात दिलासा मिळेल. म्हणून उन्हयाळयात माहे जाने १६ ते मे १६ पर्यंत ज्या सार्वजनिक बोअरवर इले.मोटार लावण्यात आले आहेत. त्या बोअरमध्ये इले. कनेक्शन महानगरपालिकेतर्फे उपलब्ध करुन देण्यास मान्यता देणेस्तव आलेल्या प्रस्तावाचे अवलोकन केले.

उपरोक्त संदर्भात चार महिन्याचे बिल महानगरपालिकेने भरण्यांस मान्यता देणेत येत आहे.

प्र नगरसचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकुब/मामुली/विशष
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.ज. ३२५० ठ. क्र. २४६
दि. १०/१/१६ रोजी ठेवता खालील प्रो. ठराव
बहुमताने/सर्वानुमते पास झाला.



सोलापूरची पुण्यनगरी ही श्री. सिध्दरामेश्वराच्या वास्तव्याने पुनित झालेली असून, श्री. सिध्दरामेश्वर या पुण्यनगरीचे ग्रामदैवत आहे. तद्वतच श्री सिध्दरामेश्वरांची यात्रा दरवर्षी जानेवारी या महिन्यामध्ये शहरामध्ये संपन्न होत असते. आणि प्रत्येक वर्षी मोठया प्रमाणात हा उत्सव साजरा होत असून, शहरवासिय यामध्ये उत्साहाने भाग घेतात व धार्मि विधीही अत्यंत वैविध्यपूर्ण रितीने वैदिक पध्दतीने संपन्न होत असतात. यात शहरवासियांच्या मोठया प्रमाणात धार्मिक भावना रुजलेल्या आहेत. याचकरिताच श्री. सिध्देश्वर देवस्थानजवळील होम मैदानाची जागा १५ डिसेंबर ते ३१ जानेवारीच्या दरम्यान श्री. सिध्देश्वर देवस्थान पंच कमिटीच्या ताब्यामध्ये देण्यांत येते. या जागेची श्री. सिध्देश्वर देवस्थान पंच कमिटीस कायमस्वरुपी आवश्यकता भासत आहे. यास्तव सदरची जागा या होम मैदानाच्या जागेची निगा श्री. सिध्देश्वर पंच कमिटीच्या वतीने राखण्यांत यावी या अटीवर सदरची जागा श्री. सिध्देश्वर पंच कमिटीच्या ताब्यास देण्यास मान्यता देणेस्तव आलेल्या प्रस्तावाचे अवलोकन केले.

याकामी सिटी सर्व्हे नं. ८४१६, सिटी सर्व्हे नं. ८४१७, सिटी सर्व्हे नं. ८४१८ व जिल्हाधिकारी कपौंडलगत बाजू गावठाणची संपूर्ण जागा सोबत जोडलेल्या नकाशात दर्शविल्याप्रमाणे ही संपूर्ण होम मैदानाची जागा, जागेची निगा राखण्यास श्री. सिध्देश्वर देवस्थान पंच कमिटीच्या ताब्यात २९ वर्षे कराराने प्रतिवर्षी रुपये १/- नाममात्र भाडयाने देण्यास मान्यता देणेत येत आहे. दि. १५ डिसेंबर ते ३१ जानेवारीच्या यात्रा कालावधी वगळता, सदर जागेचा व्हीआयपी सभा, कोणत्याही राजकीय पक्षाच्या नेत्यांचे भाषण व इतर प्रदर्शने, सर्कस व इतर सार्वजनिक कामासाठी वापर करणेकामी संपूर्ण अधिकार/हक्क सोलापूर महानगरपालिकेच्या अबाधित राहील व याकामी येणारा महसूल महानगरपालिकेत जमा होईल यांस मान्यता देणेत येत आहे.

Kulkarni P.P.
नगर सचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकच्या ~~तहकुब~~/मामुली/~~विशेष~~ सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.ज तात-४/३५१ ठ. क्र. २६९ दि. १८।१।१६ रोजी ठेवता खालील प्रो. ठराव ~~बहुमताने~~/सर्वानुमते पास झाला.

तात-४/३५१

मा. खासदार स्थानिक विकास कार्यक्रम सन २०१५-१६ अंतर्गत सोलापूर शहरातील प्र.क्र. ४९ मोहिते नगर येथील कल्याण अर्पाटमेंटच्या कंपाऊंड वॉल लगत म.न.पा. जागेत बोअर मारावे किंवा कसे? याबाबत बोअर मारुन त्यावर इले. सबमर्सिबल पंप बसूवन संस्थेच्या ताब्यात द्यावे किंवा कसे? याबाबत व कामास त्याचे रुपये ८५,९९८/- चे खर्चास, धोरणात्मक निर्णय मिळणेकामी प्रस्तावात नमूद कारणास्तव भविष्यात अपेक्षित पाणी टंचाई विचारात घेता शहरातील विविध अपार्टमेंट धारकाकडून मा. पदाधिकारी, मा. नगरसेवक आणि मा. आमदार, मा. खासदार निधीतून अशा स्वरुपाची कामे सुचविण्यात येण्याची शक्यता आहे. प्रकरणी माननियांचेकडे प्रस्ताव सादर केले असता मा. आयुक्त यांनी धोरणात्मक निर्णयासाठी जी.बी.कडे सादर करावे यास्तव मा. आयुक्त यांचे दि. १८-१-२०१६ चे टिपणीप्रमाणे मान्यता देणेत येत आहे.

(signature)

प्र. नगरसचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या ~~तहकूब~~/मामुली/~~विशेष~~ सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.ज.334 ठ. क्र. 240 दि. 9/6/2016 रोजी ठेवता खालील प्रो. ठराव ~~बहुमताने~~/सर्वानुमते पास झाला.



१४ एप्रिल २०१६ महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची १२५ वी जयंती असल्याने ती मोठया उत्साहात साजरी करण्यात येणार आहे. महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी बहुजन समाजाच्या उध्दारासाठी जे महान कार्य केले आहे ते लोकांना सदैव प्रेरणादायी ठरण्यासाठी कौन्सिल हॉल येथील गणेश मंदिराच्या डावीकडे असलेल्या भिंतीस महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची प्रतिमा श्री राजू भगवान डोलारे, मनपा सेवकांनी स्वत: रेखाटली असून ते स्वखर्चाने सदरची प्रतिमा तयार करुन देणार आहेत. तरी सदरची प्रतिमा कौन्सिल हॉल येथील गणेश मंदिराच्या डावीकडे लावणेस मान्यता देणेत येत आहे.

नगरसचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या ~~तहकूब~~/मामुली/~~विशेष~~ सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.ज.३३५ ठ. क्र.२४१ दि. १९/१/१६ रोजी ठेवता खालील प्रो. ठराव बहुमताने/~~सर्वानुमते~~ पास झाला.



१४ एप्रिल २०१६ महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची १२५ वी जयंती असल्याने ती मोठया उत्साहात साजरी करण्यात येणार आहे. महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी बहुजन समाजाच्या उध्दारासाठी जे महान कार्य केले आहे ते लोकांना सदैव प्रेरणादायी ठरण्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळा येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक (पार्क चौक) व मा. महापौर कक्षामध्ये महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनातील महत्वपूर्ण घटनांवर आधारित भित्तीशिल्प मा. महापौर प्रा. सुशीला आबुटे या स्वखर्चाने तयार करुन देणार आहेत. सदरचे भित्तीशिल्प डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळा येथे व सोलापूर महानगरपालिकेच्या मा. महापौर कक्षामध्ये लावणेस मान्यता देणेत येत आहे.

नगरसचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या ~~तहकूब/मामुली/विशेष~~
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.तात-१ ठ. क्र. २७२
दि. १९/१/१६ रोजी ठेवता खालील प्रो. ठराव
~~बहुमताने~~/सर्वानुमते पास झाला.

तात-१/३४८

धर्मवीर संभाजी तलावाच्या राष्ट्रीय सरोवर संवर्धन योजने अंतर्गत संवर्धन करणेकामी सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करणेबाबत प्रस्तावात नमूद कारणास्तव व नमूद केलेप्रमाणे उप महाप्रबंधक (परियोजना) HUDCO भारत सरकार नवी दिल्ली यांनी एकूण २१ त्रुटी उपस्थित केलेल्या आहेत त्यापैकी मुद्दा क्र. १६,१७ व २०,२१ या मुद्दयांचा मनपा ठराव अपेक्षित असून उर्वरीत मुद्दयांची पूर्तता इन्व्हीक्लीन असोसिएट्स कोल्हापूर यांचे मार्फत कार्यवाही झाली असून, सदरच्या मुद्दयांची पूर्ततेचे पत्र Dr. R.K. Singh उप महाप्रबंधक (परियोजना) HUDCO यांना सादर करणे आवश्यक आहे. प्रस्तावात २१ त्रुटींची पूर्ततेची प्रत सादर केले असून, धर्मवीर संभाजी तलावाचे राष्ट्रीय सरोवर संवर्धन योजने अंतर्गत संवर्धन करणे करिताचे सार्वजनिक बांधकाम विभागाचे दरसूची सन २०१५-१६ नुसार सुधारीत प्रकल्प अहवालातील उपांगे व किंमत प्रस्तावात नमूद तक्त्यात अ.क्र. १.० ते ५.० प्रमाणे एकूण रुपये ८,०७,०३,६००/- पैकी केंद्र शासनाचा हिस्सा ७० टक्के रुपये ५,६४,९२,५२०/- इतका व म.न.पा. हिस्सा ३० टक्के रुपये २,४२,११,०८०/- असून प्रस्तावात नमूद प्रमाणे मुद्दा क्र. १६,१७,२०,२१ ची पूर्तता करणेकामी व म.न.पा. हिस्सा २.४२ कोटी इतकी रक्कम तरतूद होवून मिळणेकामी व सार्वजनिक बांधकाम विभागाचे सन २०१५-१६ ची दरसूचीनुसार र.रु. ८.०७ कोटीच्या सुधारीत पूर्वगणनपत्रकास मान्यता मिळणेस्तव मा. आयुक्त यांचे दि. १६-१-१६ चे टिपणीप्रमाणे मान्यता देणेत येत आहे.

याकामी सन २०१६-१७ चे अंदाजपत्रकामध्ये तरतूद करणेस मान्यता देणेत येत आहे.

प्र नगरसचिव
सोलापूर महानगरपालिका